# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक २७/०८/२०२४ चे ठराव**

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६८६ विषय क्रमांक- ६८६

दिनांक - २७ /०८/२०२४ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र६८६<br>दिनांक<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/कावि/३१४/२०२४, दि.२३/०७/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३८८० दि.०६/०८/२०२४ अन्वये, मनपाचे विद्युत विभागाकडील कामांसाठी तरतुद वर्गीकरण, नवीन कामांचा समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६८६<br>दिनांक-<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.विमुका/कावि/३१४/२०२४, दि.२३/०७/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३८८० दि.०६/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २०,३०,३१, व ड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उद्यानांमधील स्ट्रीट लाईट देखभाल दुरुस्ती करणे, एलईडी फिटींगची देखभाल दुरुस्ती करणे तसेच निळुफुले नाट्यगृह मधील युपीएस सिस्टिमचे बॅटरी बदलविणे इ. कामे चालू आहेत. तसेच नवीन थेरगाव रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर तयार करणे हे काम पूर्ण झालेले आहे.<br><br>सदर कामांसाठी सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये अपुरी तरतुद असल्याने या कामांना तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. विद्युत विभागाकडील मुख्य कार्यालय , ड क्षेत्रिय कार्यालय, ग क्षेत्रिय, ह क्षेत्रिय, क क्षेत्रिय कार्यालयांमध्ये चालू आर्थिक वर्षामध्ये आवश्यक कामे करणेसाठी खालील तक्त्यात नमूद कामे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये नविन कामांचा समावेश करणेकामी व तरतूद वर्गीकरण करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अक्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकीय पानांक | अंदाज पत्रकीय रक्कम | सन २०२४-२५ ची तरतुद | सन २०२४-२५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | तरतुद घट र. रु. | तरतुद वाढ र. रु | एकुण |
| १ | मेट्रो प्रकल्पाअंतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसविणे. (सन २०२२-२३) २३२४०३२३८ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे. | ३१८ / ११५ | १०००००००० | ५७५००००० | १५८००००० | ० | ४१७००००० |
| २ | प्रभाग क्र. २७ मध्ये विविध कॉक्रीट रस्त्याचे विद्युत विषयक कामे करणे. (२०२०-२१) २२२३०६८०० | स्थापत्य प्रकल्पाअंतर्गत विद्युत विषयक कामे करणे. | ३१७ / ९८ | २०००००००० | १७९८००० | १०००००० | ० | ७९८००० |
| ३ | नवीन थेरगाव रुग्णालय येथील ई.पी.बी.एक्स आणि ध्वनीक्षेपण व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती करणे. (२०२४-२५) २४२५०१६८२ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३७० /१०७ | ५०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| ४ | नवीन थेरगाव रुग्णालय येथील अग्नीप्रतिबंधक यंत्रणेची (फायर अलार्म पॅनल, स्प्रीक्लर, हायड्रन्ट सिस्टम) देखभाल दुरुस्ती करणे. (२०२४-२५) २४२५०१६९२ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३७० /११७ | ३०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| ५ | नवीन जिजामाता रुग्णालय पिंपरी येथील ई.पी.बी.एक्स. यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. २४२५०१६९३ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३७१ / ११८ | ३०००००० | ३००००० | ३००००० | ० | ० |
| ६ | ब प्रभाग अंतर्गत विविध ठिकाणी सी.सी.टी. व्ही. यंत्रणा उभारणे | इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन योजना | ३३९ /१ | ५०००००० | २०००००० | १०००००० | ० | १०००००० |
| ७ | मनपा विविध क्रिडा सुविधांचे ठिकाणी CCTV यंत्रणा उभारणे. (२०२४-२५) | इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन योजना | ३३९ /७ | ५०००००० | २०००००० | १५००००० | ० | ५००००० |
| ८ | मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये जुन्या लिफ्ट काढुन नवीन लिफ्ट बसविणे. (लिफ्ट क्र. ३,४,५,६,७ व ८) २४२५०१९६० | कै. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय | ३०८ /१ | ५०००००० | ५०००००० | ० | ७५००००० | १२५००००० |
| ९ | प्रभाग क्र. २३ मधिल नविन थेरगाव रुग्णालयात सुसज्ज ऑपरेशन थिएटर तयार करणे व अत्यावश्यक कामे करणे. २२२३१३३२६ | इमारत योजना | ११६ /६ | ४०००००० | ४०००००० | ० | ३५५०००० | ७५५०००० |
| १० | ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ३१ मधील स्ट्रीट लाईट दिव्यांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२३-२४) २३२४०३५०० | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३६२ /२२० | ३०००००० | ५००००० | ० | ३००००० | ८००००० |
| ११ | नट सम्राट निळू फुले नाट्यमंदिर येथील युपीएस सिस्टिमची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे व युपीएस बॅटरी (सन २०२३-२४) २३२४०२९७८ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३१० /१६ | २५००००० | ४००००० | ० | ११००००० | १५००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | प्र. क्र. ८ वैष्णव माता शाळेसमोरील मोकळ्या जागेवर उद्यान विकसित करणे व योगाकेंद्र उभारणे. २२२३०६८२३ | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग १ | ३१३ /४३ | ३००००००० | ७५००००० | ० | ४०००००० | ११५००००० |
| १३ | मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उद्यानात आवश्यकतेनुसार विद्युत विषयक कामे करणे | उद्याने | नवीन | ३०००००० | ० | ० | ८५०००० | ८५०००० |
| १४ | ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत थेरगाव स्मशानभुमी येथील गॅस दाहिनीचे चालन व देखभाल दुरुस्ती करणे. | लोकारोग्य | नवीन | ६०००००० | ० | ० | १५००००० | १५००००० |
| १५ | मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील सभागृहातील ध्वनीक्षेपण व्यवस्थेची वार्षिक पध्दतीने चालन व देखभाल दुरुस्ती करणे | किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग २ | नवीन | २५००००० | ० | ० | २००००० | २००००० |
| १६ | ग क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत आवश्यक ठिकाणी वाहतुक नियंत्रक यंत्रणा बसविणे. (सन २०२४-२५) | ट्राफिक सिग्नल | नवीन | ३०००००० | ० | ० | १२००००० | १२००००० |
| एकुण | | | | | ८१५९८००० | २०२००००० | २०२००००० | ८१५९८००० |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६८७ — विषय क्रमांक- ६८७

दिनांक - २७ /०८/२०२४ — खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६८७ दिनांक २७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इ/स्था/कावि/०१/८५७/२०२४, दि.०९/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९०६ दि.१३/०८/२०२४ अन्वये, मनपाचे स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालयाकडील अंदाजपत्रकातील सन २०२४ - २५ चे अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये वाढ व घट करणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६८७ दिनांक- २७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.इ/स्था/कावि/०१/८५७/२०२४, दि.०९/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९०६ दि.१३/०८/२०२४ अन्वये, मनपाचे स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालयाकडील अंदाजपत्रकातील सन २०२४ - २५ चे अंदाजपत्रकातील तरतूदीमध्ये वाढ व घट करणेकामी प्रभाग क्र.४ येथील बोपखेल येथे स.नं.१५२ आरक्षण क्र.२/१६९ अंतर्गत एकुण ४००० स्केअर मीटर इतके क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात आलेले आहे.<br>सदर ठिकाणी शाळा इमारत उभारणेकरीता आकांक्षा फाऊंडेशन व माजी |

नगरसदस्य यांच्या मार्फत वेळोवेळी मागणी करणेत आलेली आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालयाकडील सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु करणे आवश्यक असलेली कामे समाविष्ठ करणेस तसेच विकास कामांची तरतूद वर्ग करणेची आवश्यकता असल्याने खालीलप्रमाणे "प्रभाग क्र.४ बोपखेल येथील स.नं.१५२ पै. मध्ये शाळा इमारत विकसित करणे." या कामाचा सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये नव्याने कामाचे नाव समाविष्ट करुन सदर कामास वाढ घट करणे आवश्यक आहे.

सदरचे काम तातडीचे व अत्यावश्यक असल्याने सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये वरील कामासाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात सदरच्या विकास कामांसाठी खालील प्रमाणे तरतूद वाढ व घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्रं. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. | लेखा शिर्ष | सन २०२४-२०२५ ची मुळ तरतूद | आवश्यक तरतुद र.रु. | | शिल्लक तरतूद र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वाढ | घट | |
| १ | प्रभाग क्र.४ बोपखेल येथील स.नं.१५२ पै. मध्ये शाळा इमारत विकसित करणे. | ४००००००० | विशेष योजना (नवीन काम) | ० | २५००००० | ० | २५००००० |
| २ | दिघी गावात नव्याने ताब्यात आलेले रस्ते विकसित करणे. (बजेट कोड २२२३००२५१) (पान क्र. २५, अनु क्र. ३६) | २०००००००० | विशेष योजन | ५०१७७००० | ० | २५००००० | ४७६७७००० |
| | **एकुण** | | | ५०१७७००० | २५००००० | २५००००० | ५०१७७००० |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६८९ विषय क्रमांक- ६८९

दिनांक - २७ /०८/२०२४ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६८९<br>दिनांक<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/जा/२६१/२०२४, दि.१३/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९०८ दि.१३/०८/२०२४ अन्वये, मनपाचे विद्युत विभागाकडील नविन कामांचा समावेश, प्रशासकीय मान्यता व तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेबाबत |

ठराव क्र. ६८९<br>
दिनांक-<br>
२७ /०८/२०२४

मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.कक्षेका/वि/जा/२६१/२०२४, दि.१३/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९०८ दि.१३/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ६, ८ व ९ या कार्यालयांतर्गत चालु कामांना तरतुद कमी आहे. सदर कामांकरीता तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे तसेच काही नवीन कामांचा समावेश सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात करणे आवश्यक आहे. सदर तरतुद वर्गीकरण हे विभागांतर्गत प्रस्तावित करणेत येत आहे. सदर कामांची माहिती खालील प्रमाणे

| अ क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकीय पानांक | अंदाज पत्रकीय रक्कम | सन २०२४-२५ ची तरतुद | सन २०२४-२५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | तरतुद घट र. रु. | तरतुद वाढ र. रु | एकुण |
| १ | मेट्रो प्रकल्पाअंतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसविणे. (सन २०२२-२३) २३२४०३२३८ | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे. | ३१८/ ११५ | १०००००००० | ५७५००००० | ४२५७००० | ० | ५३२४३००० |
| २ | प्रभाग क्र. ६ अंतर्गत परिसरातील नादुरुस्त केबल, फिडर पिलर बदलणे व दिवाबत्तीची अनुषंगिक वार्षिक स्वरुपाची कामे करणे. (सन २०२३-२४) | किरकोळ दुरूस्ती व देखभाल भाग-१ | ३५२/ ७५ | ५०००००० | १०००००० | ० | ५९८००० | १५९८००० |
| ३ | प्रभाग क्र. ८ अंतर्गत परिसरातील नादुरुस्त केबल फिडर पिलर बदलणे व दिवाबत्ती अनुषंगिक वार्षिक स्वरुपाची कामे करणे. ( सन २०२३-२४) | किरकोळ दुरूस्ती व देखभाल भाग-१ | ३५२/ ७९ | ५०००००० | ७७९००० | ० | ९३८००० | १७१७००० |
| ४ | प्र. क्र. ९ मधील रसरंग चौक ते म्हाडा कॉर्नर रस्ता अर्बन स्ट्रीट डिजाईन करुन सुशोभिकरण करणे ( विद्युत विषयक कामे करणे.) | स्थापत्य प्रकल्पा अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे. | ३१२/ ३४ | ३००००००० | ५०००००० | ० | ९९९००० | ५९९९००० |
| ५ | प्रभाग क्र. ६ मधील शहरी गरीब वस्तीतील दिवाबत्तीचे वार्षिक पद्धतीने देखभाल दुरुस्ती करणे व अनुषंगिक कामे करणे. ( सन २०२३-२४) | नवीन | नवीन | २५००००० | ० | ० | १७२२००० | १७२२००० |
| | एकुण | | | | ६४२७९००० | ४२५७००० | ४२५७००० | ६४२७९००० |

उपरोक्त नमुद कामांमध्ये तरतुद वर्गीकरण, नवीन कामांचा समावेश करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६९० विषय क्रमांक- ६९०

दिनांक - २७/०८/२०२४ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६९० दिनांक २७/०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सविवि/०५/कावि/२२१/२०२४, दि.१३/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९१५ दि.१३/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कचरावेचक कर्मचा-यांच्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य देणे ही नविन योजना राबविणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६९० दिनांक- २७/०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सविवि/०५/कावि/२२१/२०२४, दि.१३/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९१५ दि.१३/०८/२०२४ अन्वये, कागद,काच,पत्रा कष्टकरी पंचायत यांनी दि.०५/०२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील राहणारे व कचरावेचकांचे काम करणा-या व्यक्तींच्या मुलांना त्यांचे व्यवसायांचे आधारावर शैक्षणिक अर्थसहाय्य देणे कामी योजना सुरु करणेकामी विनंती केली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कचरा वेचकांचे काम करणा-या कर्मचा-यांच्या मुलांचे जीवनमान उंचविण्याच्या दृष्टीकोनातून व त्यांचे सक्षमीकरणासाठी प्रपत्र अ,ब,क, मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील कचरावेचक कर्मचा-यांच्या मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य देणे ही नविन शैक्षणिक योजना राबविण्यास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणे आवश्यक आहे. सदर योजना राबविण्याकामी उपलेखाशिर्ष नसलेने सदर योजनेसाठी येणारा खर्च सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात इतर योजना/ कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील र.रु.५०,०००००/- तरतुदी मधून खर्ची टाकण्यास व सन-२०२५-२६ या आर्थिक वर्षात नविन उपलेखाशिर्ष तयार करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६९२ विषय क्रमांक- ६९२

दिनांक - २७ /०८/२०२४ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६९२<br>दिनांक<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.प्रशा/५/कावि/४१३/२०२४ दि.१६/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९२२ दि.२०/०८/२०२४ अन्वये, मनपाचे गट ड संवर्गातील अग्निशमन विमोचक तथा फायरमन रेस्क्युअर अभिनामाचे पदनामांची एकूण १५० रिक्त पदे सरळसेवेने भरणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६९२<br>दिनांक-<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.प्रशा/५/कावि/४१३/२०२४ दि.१६/०८/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.३९२२ दि.२०/०८/२०२४ अन्वये, मनपाचे सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं१२२२/ प्र.क्र.५४ / का.१३-अ, दि.०४/०५/२०२२ अन्वये गट ब क व ड मधील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरणेबाबतच्या एकत्रित मार्गदर्शक सुचना प्रसिध्द केल्या आहेत. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील गट ब, गट क व गट ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता दिनांक १३/०८/२०२२ चे आदेशान्वये निवड समिती गठीत करण्यात आली आहे. सदरचे समितीचे दिनांक १३/०८/२०२२ चे सभावृत्तांता नुसार मे. टी.सी.एस. कंपनीसमवेत यापूर्वी करण्यात आलेला करारनामा नव्याने प्रसिध्द करावयाचे जाहिरातीसाठी ग्राह्य धरण्यास तसेच ऑनलाईन अर्ज केलेले प्रती उमेदवार शुल्क र.रु.४३०/- व पुरविण्यात येणा-या सेवा सुविधा करिता (ऑनलाईन परिक्षेत उमेदवारांवर सहजरित्या नियंत्रण ठेवणेकरीता प्रत्येक उमेदवाराकरीता IRIS Scan - र.रु.५०/-, HHMD Frisking - र.रु.४०/- व CCTV Recording - र.रु.५०/-) प्रती उमेदवार र.रु.१४०/- आणि शासन नियमानुसार देय जी.एस.टी.याप्रमाणे शुल्क अदा करणेस तसेच प्रत्यक्षात होणारा खर्च अदा करणेकामी मान्यता घेण्यात आली आहे.<br><br>मे.टी.सी.एस.कंपनीस यापूर्वी जाहिरात क्र.१२६५/२०२१ मधील एकूण ०७ पदांची ऑनलाईन परिक्षा घेणेकामी तसेच जाहिरात क्रमांक १८४/२०२१ मधील एकुण १६ पदांची ऑनलाईन परिक्षा घेणेकामी मा.स्थायी समिती/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने कामकाज दिलेले आहे. सदरचे कामकाज देण्यापूर्वी मे.टी.सी.एस.कंपनीचे दर हे अन्य कंपन्यांच्या तुलनेने निन्मदर असल्याने टी.सी.एस. कंपनीने प्रती उमेदवार शुल्क र.रु.४३०/- व शासन नियमानुसार देय जी.एस.टी. याप्रमाणे तसेच टी.सी.एस.कंपनीकडून ऑनलाईन परिक्षेत उमेदवारांवर सहजरित्या नियंत्रण ठेवणेकरीता प्रत्येक उमेदवाराकरीता IRIS Scan - र.रु.५०/-, HHMD Frisking - र.रु.४०/- व CCTV Recording - र.रु.५०/- या दराने सुविधा घ्यावयाचे ऐच्छीक कळविले होते. वरीलप्रमाणे मान्यतेनुसार कामकाज करुन घेणेकामी मा.आयुक्तसो व मे.टी.सी.एस.कंपनीचे प्रतिनिधी |

| | |
|---|---|
| | यांचे समवेत कामकाजाबाबतचा कारारनामा करण्यात आलेला असुन सदरचा कारारनामा मा.स्थायी समिती सभेचे सदस्यांचे स्वाक्षरीने सील केलेला आहे. दिनांक २४/०६/२०२२ रोजी झालेल्या कारारनामा SCHEDULE 1, Contract Term मध्ये सदरचा कारारनामा हा दि.२६/०५/२०२२ पासुन पुढील ०३ वर्षाकरीता ग्राह्य असल्याचे नमूद करण्यात आले<br><br>आहे. मे.टी.सी.एस.कंपनीकडील दिनांक १०/०१/२०२४ चे ई-मेलनुसार यापूर्वी झालेला कारारनामा सदरचे जाहिरातीनुसार कामकाजासाठी ग्राह्य धरुन वरीलप्रमाणे ऑनलाईन परिक्षेचे दर स्वीकृत करुन त्याप्रमाणे सदरचे जाहिरातीचे कामकाज करणेस मे.टी.सी.एस. कंपनीने संमती कळविली आहे. त्यामुळे यापूर्वी मे.टी.सी.एस. कंपनीसमवेत करण्यात आलेला कारारनामा प्रसिध्द केलेले जाहिरात क्र. ६७०/२०२४ चे सर्व कामकाजासाठी ग्राह्य धरण्यात येऊन त्याप्रमाणे अग्निशमन विमोचक तथा फायरमन रेस्क्युअर पदांचे ऑनलाईन परिक्षेचे अनुषंगाने संगणक सामग्रीसह कामकाज करुन घेण्यात येणार आहे.<br>जसे की- उमेदवारांचे ऑनलाईन अर्ज स्विकारणे, उमेदवारांचे हॉल टिकिट तयार करणे,परिक्षा केंद्र निश्चित करणे, वर्गनिहाय उमेदवार संख्या निश्चित करणे, परिक्षा केंद्रावर पर्यवेक्षक नेमणे खाजगी सुरक्षा व्यवस्था करणे, ऑनलाईन परिक्षेकरीता प्रश्नपत्रिका तयार करणे, परिक्षेनंतर उमेदवारांची सर्वसाधारण गुणानुक्रम यादी तयार करणेबाबतचे कामकाज करुन घेण्यात येणार आहे. तसेच (IRIS,HHMD व CCTV) सुविधा घेणेत येणार आहेत. जाहिरात क्र.६७०/२०२४ मधील गट ड संवर्गाच्या ऑनलाईन भरतीचे सर्व टप्प्यांचे कामकाज मे.टी.सी.एस. कंपनीस देण्यास व सदर जाहिरातीनुसार २१३४ ऑनलाईन प्राप्त उमेदवारांचे अर्जा नुसार प्रति उमेदवार शुल्क र.रु.५७०/- दराने एकुण र.रु. १२,१६,३८०/- (अक्षरी र.रु. बारा लाख सोळा हजार तीनशे ऐंशी फक्त) व शासन नियमानुसार देय GST तसेच प्रत्यक्ष होणा-या खर्चास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६९३ विषय क्रमांक- ६९३

दिनांक - २७/०८/२०२४ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६९३<br>दिनांक<br>२७/०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२१४/२०२४ दि.१४/०८/२०२४ अन्वये, निगडी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे टर्मिनस मधील दोन बस थांबाशेड निष्कासिक करणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६९३<br>दिनांक-<br>२७/०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/२१४/२०२४ दि.१४/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत निगडी येथील जुन्या जकात नाक्याचे जागेवर सन २०१७- १८ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बस टर्मिनस बांधणेत आले आहेत. सदर कामांतर्गत ५ प्लॅटफॉर्म शेडसह उभारणेत आलेले आहे. सद्यस्थितीत पिंपरी ते निगडी महामेट्रो प्रकल्पास केंद्र शासनाचे पत्र क K- 14011/21/2019-MRTS-11, दि. २३/१०/२०२३ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार महामेट्रो ने निविदा प्रक्रिया राबवून पिंपरी ते निगडी मेट्रो मार्गिका क १ए च्या विस्तारीत मार्गाचे काम सुरू केलेले आहे. महा मेट्रोचे काम करताना अण्णाभाऊ साठे बस टर्मिनस येथे महामेट्रोचे स्टेशन बांधणेचे नियोजन आहे. महामेट्रोचे मार्फत स्टेशन बांधतांना ५ पैकी दोन प्लॅटफॉर्म शेडसह निष्कासीत करून त्या ठिकाणी महामेट्रो स्टेशन उभारणेत येणार आहे. व महामेट्रोची काम पुर्ण झाल्यानंतर दोन्ही प्लॅटफॉर्म महामेट्रो मार्फत नव्याने तयार करणेत येणार आहे.<br>सदरचे निष्कासित करावे लागणारे दोन्ही प्लॅटफॉर्म शेडसह पिंपरी चिंचवड महानगरपालिकामार्फत उभारणेत आले असल्याने सदर प्लॅटफॉर्मच्या निष्कासनापुर्वी महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महामेट्रोचे स्टेशन बांधणेसाठी अण्णाभाऊ साठे बस टर्मिनस येथील दोन बस प्लॅटफॉर्म शेडसह काढणे आवश्यक आहे. अण्णाभाऊ साठे बस टर्मिनस येथील दोन बस प्लॅटफॉर्म शेडसह काढणेबाबतच्या प्रस्तावास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६९४ विषय क्रमांक- ६९४

दिनांक - २७ /०८/२०२४ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६९४<br>दिनांक<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/६/कावि/५३२/२०२४ दि.२३/०८/२०२४ अन्वये, दिवंगत शिंदे मंगल यशवंत यांचे कोरोनामुळे निधन झाले आहे. त्यांमुळे त्यांचे जागेवर अनुकंपा तत्वानुसार विशेष बाब म्हणुन नियुक्तीस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६९४<br>दिनांक-<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/६/कावि/५३२/२०२४ दि.२३/०८/२०२४ अन्वये, दिवंगत शिंदे मंगल यशवंत ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत आरोग्य विभागामध्ये मे. हेमांगी एन्टरप्रायजेस या संस्थेमार्फत कंत्राटी सफाई कर्मचारी म्हणुन कामकाज करत होत्या.<br><br>त्यांचा मृत्यु हा कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) मुळे झाल्यामुळे त्यांचे वारसास कामगार कल्याण विभागाकडील आदेश क्र.काक/२/कावि/२४५/२०२०, दि.०९/०४/२०२० आदेशान्वये अनुकंपा तत्वानुसार वारस नियुक्ती देणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे जागेवर त्यांचा वारस मुलगा श्री. हरिदास यशवंत शिंदे यांनी कोव्हीड विषाणूमुळे मृत्यु झाल्यास मिळणा-या लाभाची मागणी दिनांक २१/०१/२०२१ रोजीच्या विनंती अर्जान्वये केली होती. सदरचे प्रकरण प्रस्तावीत असताना श्री. शिंदे हरिदास यशवंत त्यांचे दिनांक ०५/०२/२०२२ रोजी निधन झाले आहे.<br><br>दिवंगत शिंदे मंगल यशवंत, कंत्राटी सफाई कर्मचारी यांचा मुलगा दिवंगत शिंदे हरिदास यशवंत हा निधन पावल्यानंतर त्यांची पत्नी व दिवंगत कंत्राटी कर्मचारी यांची सून श्रीम. शिंदे रमा हरिदास यांनी त्यांचे सासूचे जागेवर अनुकंपा तत्वानुसार वारस नियुक्ती मिळणेबाबत मा. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, नवी दिल्ली यांना दिनांक १६/०५/२०२२ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे. त्याची प्रत इकडील विभागास सादर केली आहे.कामगार कल्याण विभागाकडील आदेश क्र.काक/२/कावि/२४५/२०२०, दि. ०९/०४/२०२० रोजीच्या आदेशातील "ड) कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) प्रतिबंध व उपद्रव याकामी कार्यरत मनपा करीता सेवा देणारे कंत्राटी व मानधनावरील सर्व कामगार यांचे कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे निधन झाल्यास त्यांचे वारसांना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वास्थ मिशन अंतर्गत "Pradhan Mantri Garib Kalyan Package Insurance Scheme For Health Workers Fighting COVID-19"या योजनेअंतर्गत र.रु. ५० लाख अर्थसहाय्य अनुदेय राहील. तसेच महापालिकेतर्फे अतिरिक्त र.रु. २५ लाख देय राहील अथवा मा. महापालिका सभा व महाराष्ट्र शासनाच्या मंजूरीनंतर विशेष बाब म्हणून कायदेशीर वारसास मनपा सेवेत नियुक्तीचा लाभ देय राहील अशी तरतुद आहे. |

| | |
|---|---|
| | उपरोक्त कामगार कल्याण विभागाकडील आदेशानुसार दिवंगत शिंदे मंगल यशवंत, कंत्राटी सफाई कर्मचारी यांची वारस सून श्रीम. शिंदे रमा हरिदास यांना नियुक्ती देणेपुर्वी मा. महापालिका सभा व महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीनंतर विशेष बाब म्हणुन कायदेशिर वारसास मनपा सेवेत नियुक्ती देण्याची तरतुद आहे. त्यानुसार श्रीम. शिंदे रमा हरीदास यांना एक विशेष बाब म्हणुन नियुक्तीस मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६९५      विषय क्रमांक- ६९५
दिनांक - २७ /०८/२०२४      खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६९५<br>दिनांक<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र.क्र.साप्रवि/०७/कावि/३५२/२०२४ दि.२७/०८/२०२४ अन्वये, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता या पदाचे पदनाम समाजसेवा अधिक्षक ( वैद्यकीय ) असे करण्यास मान्यता मिळणेबाबत. |
| ठराव क्र. ६९५<br>दिनांक-<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र.क्र.साप्रवि/०७/कावि/३५२/२०२४ दि.२७/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२०, दिनांक १८ फेब्रुवारी २०२० अन्वये शासन मंजूर झाले आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर निमवैद्यकीय सेवा गट क - वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता या पदनामाचे पद यापुर्वी मान्यता प्राप्त आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचेसमवेत कर्मचा-यांच्या विविध मागण्या संदर्भात आयोजित केलेल्या बैठीकीमध्ये “ वैद्यकीय समाजिक कार्यकर्ता” या पदाचे पदनाम शासन निर्णयानुसार समाजसेवा अधिक्षक ( वैद्यकीय ) असे करणेबाबत कर्मचारी संघटनेच्यावतीने मागणी करण्यात आलेली आहे.तसेच वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता पदावरील कार्यरत कर्मचारी यांनीही वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता पदाचे पदनामामध्ये बदल करणेकामी |

| | |
|---|---|
| | विनंती अर्ज सादर केले आहेत.<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा गट – ब वर्गामध्ये समावेश करणेत आलेला आहे.महानगरपालिका आस्थापनेवरील " वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता"या अभिनामाच्या पदाचे कर्मचारी हे महानगरपालिकेमध्ये जबाबदारीचे व महत्वाचे पदावर शाखाप्रमुखांचे अधिनस्त कामकाज करीत असतात.<br><br>महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सूट - ०४११/प्र.क्र.४७/वैसेवा – ४ , दिनांक - ४/१२/२०११ अन्वये वैद्यकीय व मनोविकृती समाजिक कार्यकर्ता संघटना,मुंबई यांनी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता व मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता यांच्या पदनामात बदल करण्याची मागणी महाराष्ट्र शासनाकडे केली होती त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने दि.०७/११/२०११ रोजी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता या पदाचे सध्याचे पदनाम बदलून समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय) असे करण्यात यावे,यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता या पदाचे पदनाम शासन निर्णयानुसार समाजसेवा अधिक्षक (वैद्यकीय ) असे करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६९६ — विषय क्रमांक- ६९६

दिनांक - २७ /०८/२०२४ — खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६९६<br>दिनांक<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र.क्र. जनि/ता.मु/कावि/१०७/२०२४ दि.२७/०८/२०२४ अन्वये, राष्ट्रीय नागरी सुधारणा अंतर्गत केंद्रशासनाच्या अमृत योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील मलनिःसारण व्यवस्था व मैलाशुध्दीकरण केंद्र उभारणे व पुढील ५ वर्षा करीता देखभाल व दुरूस्ती करणे प्रकल्प राबविणे (अमृत योजना) या कामाचा सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकातील १५ व्या वित्त आयोगाच्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६९६<br>दिनांक-<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र.क्र. जनि/ता.मु/कावि/१०७/२०२४ दि.२७/०८/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलनिःसारण विभागांद्वारे अमृत १ अंतर्गत शहरामध्ये चिखली, पिंपळे निलख व बोपखेल येथे मैलाशुध्दीकरण प्रकल्प व उदंचन केंद्रे उभारण्याची कामे आणि मनपा परिसरातील जलनिःसारण नलिका टाकण्याचे |

| | |
|---|---|
| | काम करण्यात येत आहे. सदर कामाकरिता केंद्र व राज्यशासनाच्या हिस्सा त्यांचे व्दारे देण्यात आला असुन तो सर्व खर्च झालेला आहे व उर्वरित मनपाचा हिस्सा १५ व्या वित्त आयोगातुन देणेकरिता मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे.<br>सदर अमृत १ मधील कामाचे मनपा हिस्सा देयक देणेकरिता सदरचे काम १५ व्या वित्त आयोगाच्या अंदाजपत्रकात समावेश करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे. |

| अनु. क्र. | कामाचे नाव | पान अनु.क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२४-२५ चा अंदाज |
|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय नागरी सुधारणा अंतर्गत केंद्रशासनाच्या अमृत योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील मलनिःसारण व्यवस्था व मैलाशुध्दीकरण केंद्र उभारणे व पुढील ५ वर्षा करीता देखभाल व दुरूस्ती करणे प्रकल्प राबविणे (अमृत योजना) | नवीन काम | १,४६,००,००,०००/- | ५५,५०,००,०००/- |
| | **एकूण** | | **१४६,००,००,०००/-** | **५५,५०,००,०००/-** |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

मा.प्रशासक ठराव क्रमांक- ६९७ विषय क्रमांक- ६९७

दिनांक - २७ /०८/२०२४ खाते – मा.आयुक्त

| | |
|---|---|
| ठराव क्र ६९७<br>दिनांक<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र.क्र. जा.क्र. नरवि/कावि/३३/२९१/२०२४, दि.२७/०८/२०२४ अन्वये, मनपाचे मौजे भोसरी कासारवाडी येथील जुना पुणे मुंबई रस्ता ते स.नं.३९८ पर्यंत सि.एम.ई. लगत ९.०० मी. रुंद रस्त्याने बाधित जमिनीचे भूसंपादन करणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ६९७<br>दिनांक-<br>२७ /०८/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र.क्र. जा.क्र. नरवि/कावि/३३/२९१/२०२४, दि.२७/०८/२०२४ अन्वये, मौजे भोसरी कासारवाडी स.नं.३९० पै.,३९१ पै,३९२ पै,३९३ पै,३९४ पै,३९५ पै,३९६ पै,३९७ पै. व ३९८ पै. मधिल जुना पुणे मुंबई रस्ता ते स.नं.३९८ पर्यंतचा मंजूर विकास योजनेत सि.एम.ई. लगत सुमारे ७६०.०० मी. लांबीचा ९.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करणेत आला असुन सदर रस्त्याने बाधित काही जागा टिडीआर/एफएसआय चे बदल्यात मनपाचे ताब्यात आलेल्या आहेत. शहराचे वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाढती रहदारी पाहता उक्त रस्त्याचे खालील तक्यात दर्शविलेल्या प्रमाणे भूसंपादन करणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | रस्ता/ आरक्षणाचे प्रयोजन | स. नं./ग.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| १. | ९.०० मी. रस्ता | स.नं.३९० पै., ३९१ पै,३९२ पै, ३९३ पै, ३९४ पै, ३९५ पै, ३९६ पै, ३९७ पै. व ३९८ पै. | ६८४०.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**